स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
Phone: (02462) 215242 (Ext. 152) ACADEMIC (AFFILIATION) SECTION Website: srtmun.ac.in
Fax:(02462) 215572 email: affiliation@srtmun.ac.in

जा.क्र. शैक्षणिक/संलग्न–०३/२०२६–२०२७/230 दिनांक: १०/०७/२०२६

प्रती, **महत्वाचे पत्र**

**प्राचार्य/महाविद्यालय संस्था अध्यक्ष व सचिव.**
**१)भारती कला व विज्ञान महाविद्यालय, हादगाव जि. नांदेड. (७३५)**
**२)संत भगवानबाबा कला व विज्ञान महाविद्यालय, बोधडी जि. नांदेड.(७३७)**
**३)समर्थ महाविद्यालय, कुरूळा जि. नांदेड.(७६२)**

विषय: शैक्षणीक वर्षे २०२६–२०२७ करीता बी.एस्सी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाचे प्रवेश स्थगीत करणे बाबत.
सदर्भ: या विभागाचे पत्र क्र. जा.क्र. शैक्षणिक/संलग्न–०३/२०२६–२०२७/१५३, दिनांक: ०६/०७/२०२६

महोदय,

उपरोक्त विषयी व संदर्भीय पत्रानुसार आपल्या महाविद्यालयातील बी.एस्सी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाचे प्रवेश स्थगित करण्यात आलेले होते या पत्राच्या अनुषंगाने प्रस्तुत विद्यापीठाचे अधिसभा सदस्य श्री नवनाथ चव्हाण यांच्या समावेत आपल्या महाविद्यालयाच्या संस्थेचे अध्यक्ष/सचिव/पदाधिकारी यांनी दि. ०८/०७/२०२६ रोजी विद्यापीठामध्ये मा. कुलगुरू महोदय व मा. प्र. कुलगुरू महोदय यांची प्रत्यक्ष भेट घेवुन वरील संदर्भीय पत्र रद्द करावे अशी विनंती केलेली होती. तसेच आपल्या महाविद्यालयास बी.एस्सी अभ्यासक्रमासाठी प्रयोगशाळा व महाविद्यालयातील इतर सोयीसुविधा तपासणी करण्यासाठी विनंती केलेली होती. त्यानुसार दि. ०९/०७/२०२६ रोजी मा. कुलगुरू महोदय मा. प्र. कुलगुरू, महोदय विज्ञान तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता व प्रस्तुत विद्यापीठाचे कुलसचिव यांनी **भारती कला व विज्ञान महाविद्यालय, हादगाव जि. नांदेड. (७३५) ,संत भगवानबाबा कला व विज्ञान महाविद्यालय, बोधडी जि. नांदेड(७३७) यांना भेट दिली तसेच दि. १०/०७/२०२६ रोजी समर्थ महाविद्यालय, कुरूळा जि. नांदेड.(७६२)** या ठिकाणी प्रत्यक्ष भेट देवुन बी.एस्सी अभ्यासक्रमाच्या प्रयोगशाळेची तपासणी करण्यात आली त्यामध्ये अनेक त्रुटी आढळुन आलेल्या आहेत. बी.एस्सी अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांना पुरक सोयीसुविधा नसल्याचे आढळुन आले तसेच आंतर्गत परीक्षेचे रेकॉड व इतर बाबींचे दस्तावेज आढळुन आलेले नाहीत, प्रॅक्टीकल परीक्षेचे रेकॉर्ड नाहीत व प्रात्यक्षिक घेण्यासाठी अनुभवी शिक्षक नाही ही बाब अत्यंत गंभीर आहे.

सबब, वरील सर्व परिस्थिती बघता आपल्या महाविद्यालयातील वरील परिपत्रकानुसार बी.एस्सी अभ्यासक्रम प्रथम वर्षाचे प्रवेश २०२६–२०२७ साठी स्थगित करण्याचा निर्णय कायम ठेवण्यात येत आहे याची नोंद घ्यावी.

आपला
उपकुलसचिव,
शैक्षणिक (संलग्नीकरण) विभाग

प्रत माहितीस्तव:
०१.मा.कुलगुरु महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
०२.मा.प्र.कुलगुरु महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
प्रत माहिती तथा कार्यवाहीस्तव:
मा. प्र. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ – यांना एक प्रत देवून कळविण्यात येते की, वरील महाविद्यालयातील बी. एस्सी प्रथम वर्षाचे विद्यार्थ्याचे शै. वर्ष २०२६–२७ साठी पात्रता व परीक्षा आवेदनपत्र स्वीकारण्यात येवु नये ही बाब संबंधीतांना सुचित करावे.